# महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्क गणेश उत्सव २००८

७ सप्टेंबर २००८

महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्कच्या गणेश उत्सव मोठया थाटात ७ सप्टेंबरला बेसाइडच्या शाळेत २५० मंडळींच्या उपस्थीतीत पार पडला. सकाळी ९ वाजल्यापासूनच गणपतीच्या गाण्यांनी वातावरण प्रसन्न होते. थोडयाच वेळात गणरायाचे आगमन झाले आणि "गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया" या घोषणांनी हॉल दुमदुमला. आयोजकांनी गणपतीची आरास छान मांडली होती आणि विशेष म्हणजे श्री. सुहास तवकरांनी गणरायाच्या आसनासाठी अतिशय उत्तमरीत्या देव्हारा सुशोभित केला होता.

श्रीमती खरे यांनी गणेशाच्या पूजेला आरंभ केला. मंडळातलीच २ नवविवाहीत जोडपी पूजेला दाम्पत्ये होती. साधारणपणे ११ च्या सुमारास आरत्यांना सुरूवात झाली आणि मग गणेशाच्या दर्शनासाठी रांग लागली. हयावर्षी महाप्रसादाचा खास सुग्रास मराठी जेवणाचा आस्वाद न्यूयॉर्कच्या मंडळींनी मोठया आवडीने घेतला.

त्यानंतर कार्यक्रमाला सुरूवात झाली. श्रीमती फाटक यांनी गणेश उत्सवाबद्दल थोडी माहीती दिली आणि कार्यक्रमाच्या पाहुण्यांची सर्वाना औळख करून दिली. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी श्री अनिरूध्द किन्रे यांनी पुन्हा एकदा सर्व मंडळींचे स्वागत केले आणि गेल्या महीन्यातच झालेल्या सर्वेचे विक्षेपण सांगीतले. सर्वेतल्या एका सूचनेचा, म्हणजेच लाइफ मेंबरांसाठी पुढील जागा आरक्षीत ठेवण्याच्या, विनंतीवर तात्काळ अंमल करण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर आपल्याच मंडळाचे नवोदित व्यवस्थापक अमोल सर्वा यांनी आपल्या नविन व्यवसायाची आणि त्यांनी अविष्कारीत केलेल्या PEEk Device ची माहीती दिली.

त्यानंतर नॉर्थ कॅरोलीना येथून आलेल्या श्रीमती मोहना जोगळेकर आणि त्यांचे सुपुत्र रूत्विक जोगळेकर यांच्या खास शैलीतल्या कथाकथन व Stand-up Comedy च्या मनोरंजनाच्या कार्यक्रमाला सुरूवात झाली. श्रीमती जोगळेकर यांनी अनेक कथा सांगीतल्या. त्यातली "भाषेची ऐशी तैशी" या कथेने प्रेक्षकांत चांगलाच हशा पिकवला आणि "माणसांची भाषा" या कथेने मनात थोडा ओलावाही निर्माण केला. १५ वर्षाच्या रूत्विकनेतर फारच धमाल केली. त्याच्या आजोबांबरोबरच्या गोष्टी ऐकून तर आलेल्या मंडळींची चांगलीच हसून मुरकुंडी वळाली. मध्यंतरात श्रीमती जोगळेकरांनी, डॉ. सतिश साळवी यांचे कोकणच्या पर्यावरणावर आलेल्या संकटाचे एक आवाहन वाचून मंडळींना आपल्या मायभूमीच्या हाकेची जाणीवही करून दिली.

त्यानंतर गणेशाची उत्तरपूजा आणि आरती झाली आणि पुन्हा एकदा "गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या" या घोषणांनी वातावरण दुमदुमले. एकून कार्यक्रम ठरल्या वेळेत सुरू झाला आणि ठरल्या वेळेत आटोपला याबद्दल सर्वांनी आयोजकांची प्रशंसा केली आणि आलेल्या मंडळींना एक दिवस का होइना पण आपल्या घरी आणि मायभूमीतच असल्यासारखी जाणीव करून दिली म्हणून आयोजकही आनंदात घरी परतले.

– अनिरूध्द किन्रे